# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

## (विद्या विभाग)

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी–पॉईंट मार्ग, नागपूर – ४४० ०३३

ई–मेल: dracademics@gmail.com


क्रमांक: रातुमनावि/विद्या/२६/३१० दिनांक ४ ऑगस्ट, २०२६

## अधिसूचना

संदर्भ : १. अधिसुचना क्रमांक Acad./ Acad.Cale./2026/183, dated 4th May 2026.

२. अधिसुचना क्रमांक Acad./Acad.Cale./2026/188 date 7th May 2026.

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठ संलग्नित/संचालित महाविद्यालये व विद्यापीठ स्वायत्ता प्राप्त शैक्षणिक विभागाकरिता सत्र २०२६–२७ साठी शैक्षणिक वेळापत्रक संदर्भिय अधिसूचनान्वये निर्गमित करण्यात आले असून, वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांना प्रथम सत्रात प्रवेशाची अंतिम तारीख ३ ऑगस्ट, २०२६ देण्यात आली आहे. आता संदर्भिय अधिसूचनांना जोडून, अध्यादेश क्रमांक २/१९७९ मधील तरतुदीनुसार व मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेनुसार, विद्यापीठ संलग्नित/ संचालित महाविद्यालये व विद्यापीठ स्वायत्ता प्राप्त शैक्षणिक विभागात **सत्र २०२६–२७ मध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या संबंधित विद्यार्थ्यांसाठी प्रवेश घेण्याची अंतिम तारीख दिनांक २ सप्टेंबर, २०२६ पर्यंत वाढविण्यात येत आहे.** सदर प्रवेशाची वाढविण्यात आलेली मुदतवाढ ही शासनाद्वारे गठीत असलेल्या **केंद्रीय प्रवेश समितीद्वारे होणाऱ्या प्रवेशास लागू राहणार नाही,** याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये,

(डॉ. विजय खंडाळ)
प्रभारी कुलसचिव

**प्रतिलिपी माहीतीकरीता व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित :**

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित व संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख
३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सर्व अधिकारी
४. नागपूरातील सर्व वृत्तपत्रांचे मा. संपादक.
आपणास विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना लोकप्रिय दैनिकांत बातमी रूपाने प्रसिध्द करून सहकार्य करावे.

(गणेश कुमकुमवार)
उपकुलसचिव (विद्या)
अति. प्रभार